# Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part- 2): Chapter 6- या झोपडीत माझ्या




For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-9-marathi-kumarbharati-part-2-chapter-6-ya-zopadit-mazya/

IndCareer

# Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part-2): Chapter 6- या झोपडीत माझ्या

Class 9: Marathi Kumarbharati Chapter 6 solutions. Complete Class 9 Marathi Kumarbharati Chapter 6 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part- 2): Chapter 6- या झोपडीत माझ्या

Maharashtra Board 9th Marathi Kumarbharati Chapter 6, Class 9 Marathi Kumarbharati Chapter 6 solutions

**Questions and Answers**

***1.*** *कवितेत आलेल्या आशयानुसार पुढील मुद्द्यांतील फरक लिहा:*

**प्रश्न 1.**

कवितेत आलेल्या आशयानुसार पुढील मुद्द्यांतील फरक लिहा:

| झोपडीतील सुखे | महालातील सुखे |
|---|---|
| 1. | 1. |
| 2. | 2. |

**उत्तर:**

| झोपडीतील सुखे | महालातील सुखे |
|---|---|
| 1. ताऱ्यांकडे पाहत जमिनीवर निजावे. | 1. झोपण्यासाठी मऊ बिछाने. |
| 2. देवाचे नाव नित्य गावे. | 2. कंदील व शामदाने यांची रोषणाई. |

***2.*** आकृतिबंध पूर्ण करा*:*

प्रश्न **1.**

आकृतिबंध पूर्ण करा:




उत्तर:




***3.*** चौकटी पूर्ण करा*:*

प्रश्न **1.**

चौकटी पूर्ण करा:




उत्तर:

1. निजावयास जमीन

2. रात्री गगनातले तारे

***4.*** *‘तिजोरी’ हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.*

प्रश्न **1.**

‘तिजोरी’ हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

उत्तरे

धनदौलत संग्रहित ठेवण्याचे (साठवण्याचे) साधन कोणते?

***5.*** काव्यसौदर्य*:*

प्रश्न (अ)

‘पाहुनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे

शांती सदा विराजे या झोपडीत माझ्या’. या काव्यपंक्तींतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

उत्तर:

देवांचा राजा इंद्र हा स्वर्गात राहतो. स्वर्गात सर्व सुखे असतात. सुखसमाधान व शांतीचा वास स्वर्गात आहे, अशी कल्पना आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आनंदमय झोपडीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात – माझ्या झोपडीत सुखसमाधान आणि शांतीचे है साम्राज्य आहे. झोपडीत एवढे पराकोटीचे सौख्य मला लाभते की इंद्रालासुद्धा माझ्या सखाचा हेवा वाटतो. माझे सुख पाहून इंद्राला माझा हेवा वाटतो. झोपडीतील सुखाची महती सांगणारा विचार या ओळीतून व्यक्त होतो.

प्रश्न (आ)

‘दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या’ या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.

उत्तर:

महालातील धनदौलत ही बंदिस्त असते. तिजोरीला भक्कम कडीकुलूप लावलेले असते. चोरी होऊ नये; म्हणून धनावर सक्त पहारे ठेवले जातात. संपूर्ण महाल कडेकोट बंदोबस्तात असतो. कवी म्हणतात – माझी झोपडी सदैव खुली असते. धनदौलत नसल्यामुळे माझ्या झोपडीचे दार दोऱ्यांनी, कड्याकुलपाने बंद करावे लागत नाही. झोपडीला चोराचे भय नाही. येथे आनंदाने सर्वांचे स्वागत करण्यासाठी माझी झोपडी सताड उघडी असते. या ओळीतून कवीच्या मनाचा मोठेपणा व्यक्त झाला आहे.

***1.*** झोपडी व महाल यांच्यातील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा***.***





झोपडी: ………………………………………………………………………..

महाल: ………………………………………………………………………..

झोपडी: ………………………………………………………………………..

महाल: ………………………………………………………………………..

झोपडी: ………………………………………………………………………..

महाल: ………………………………………………………………………..

झोपडी: ………………………………………………………………………..

महाल: ………………………………………………………………………..

***2.*** उजळणी- तक्ता पूर्ण करा***.***

| | | |
|---|---|---|
| उपमेय – आईचे प्रेम सागर | उपमान – | उपमेय – आंचा उपमान – साखर |
| उपमा | | आईचे प्रेम सागरासारखे असते. |
| उत्पेक्षा | | आईचे प्रेम म्हणजे जण सागरच. |
| रूपक | | वात्सल्यसिप आई. |

***3.* महण म्हणजे काय*?***

‘मह’ शाविषय मनोरंजक आहे. आपण व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या म्हणी – उदा. -‘आये तसे भरा किया ‘गामाता गुळाची चा काय’ यांसारख्या म्हणींचा अभ्यास केला तर, ‘म्हण म्हणजे शहाणपणाने भरलेले वचन.’ या ज्ञानाचा आपल्याला बोलताना, लिहिताना अनेक प्रसंगी उपयोग करता येतो आणि आपले बोलणे, लिहिणे अधिक प्रभावशाली करता येते. भाषेला सौंदर्य प्राप्त होते. किंबहुना त्या भाषेची ती भूषणे आहेत. शब्द म्हणजे वाहूनही कटीन असतात आणि फुलातूनही कोमल असतात, असे म्हटले जाते ते शब्दांच्या अर्वासाठी.

IndCareer




**Additional Important Questions and Answers**

*1.* पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा *:*

कृती *1: (*आकलन*)*

प्रश्न 1.

आकृतिबंध पूर्ण करा:

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-9-marathi-kumarbharati-part-2-chapter-6-ya-zopadit-mazya/

IndCareer

(1) महालात → चोऱ्या होतात | कारण → [ ]

(2) झोपडीत → चोऱ्या होत नाहीत | कारण → [ ]

उत्तर:

(1) महालात → चोऱ्या होतात | कारण → तिजोऱ्यांमध्ये धनदौलत आहे.

(2) झोपडीत → चोऱ्या होत नाहीत | कारण → चोरण्याइतपत धनदौलत नाही.

कृती ***2:*** *(आकलन)*

प्रश्न **1.**

चौकटी पूर्ण करा:

(1) महालात जाण्यासाठी हा शब्द येतो → [ ]

(2) महालात चोऱ्या होऊ नयेत म्हणून लावले जातात → [ ]

उत्तर:

1. मज्जाव

2. पहारे

प्रश्न **2.**

योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-9-marathi-kumarbharati-part-2-chapter-6-ya-zopadit-mazya/

1. झोपडीतले सौख्य पाहून ……………… लाजतो. (देवेंद्र/सुरेंद्र/वीरेंद्र/राजेंद्र)

2. झोपडीत नित्य ……… विराजते. (भ्रांती/खंती/शांती/भक्ती)

उत्तर:

1. झोपडीतले सौख्य पाहून देवेंद्र लाजतो.

2. झोपडीत नित्य शांती विराजते.

कृती ***3 : (***दोन ओळींचा सरळ अर्थ***)***

प्रश्न **1.**

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली

ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या

उत्तर**:**

झोपडीत राहण्याचे सुख वर्णन करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात -एखादया राजालाही राजमहालात जे सुखसमाधान मिळाले असेल, ती सर्व सुखे मला माझ्या झोपडीत मिळतात.

पुढील कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा***:***

प्रश्न **1.**

कविता **–** या झोपडीत माझ्या**.**

उत्तर**:**

या झोपडीत माझ्या

1. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री → राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज.

2. कवितेचा विषय → अत्यंत साध्या राहणीतही परमोच्च सुख साठलेले असते. सुख व शांती माझ्या झोपडीत कशी मिळते, याचे निवेदन या कवितेत केले आहे.

3. कवितेतील दोन शब्दांचे अर्थ →

1. सौख्य = सुख
2. भूमी = जमीन
3. नाम = नाव

4. मज्जाव = मनाई
5. भीती = भय
6. मऊ = नरम
7. बोजा = वजन, भार
8. सदा = सतत.

4. कवितेतून मिळणारा संदेश → श्रीमंतीचा, वैभवाचा हव्यास करू नये, जे प्राप्त परिस्थितीत मिळते, ते जास्त सुखकारक असते. शुद्ध मनाने गरिबीत जगताना समाधान मिळते, ही शिकवण मिळते.

5. कवितेची भाषिक वैशिष्ट्ये → कवितेच्या आशयाला पूरक असा सैलसा 'ओवी' हा पूर्वीचा लोकछंद या कवितेत आहे. ओवी छंदात तीनही चरणांत यमक साधलेले असते. प्रस्तुत रचनेचा सहजपणे तत्त्व बिंबवण्याचा गुण आहे. पैसा, दौलत, श्रीमंती हे चोरीला उत्तेजन देणारे घटक आहेत; परंतु गरिबाच्या मनातील निर्मळ भाव हा त्यास अभय देतो हा संदेश इतक्या सोप्या शब्दांत मांडला आहे की, ओवी सहज ओठात रुळते. गुणगुणावीशी वाटते. प्रत्येक ओवीचा शेवट – 'या झोपडीत माझ्या' असा केल्याने आशयाची घनता वाढते.

6. कवितेतून व्यक्त होणारा विचार → महालातील सुखे व झोपडीतील सुखे यांची तुलना या कवितेत केली आहे. झोपडीतल्या साध्या राहणीत सुखसमृद्धी व शांती मिळते, हे सांगितले आहे. साधी राहणी, उच्च विचारसरणी मनात ठसवली, तर मानसिक सुख लाभते.

7. कवितेतील दोन ओळींचा सरळ अर्थ :

पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे

शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या

→ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज झोपडीचे माहात्म्य सांगताना म्हणतात-झोपडीत राहण्याचे माझे सुख पाहून इंद्रही मनात लाजतो. माझ्या सुखाचा इंद्राला हेवा वाटतो. माझ्या झोपडीत नेहमी सुखशांती नांदते.

8. कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे → राजालाही जी सुखे मिळत नाहीत, ती माझ्या झोपडीत आहेत. खुल्या निसर्गात, जमिनीवर पहुडताना, मानाने, सुखासमाधानाने जगावे, हे अतिशय सहजपणे कवितेत बिंबवले असल्यामुळे ही कविता मला खूप आवडली.

पुढील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत करा*:*

**प्रश्न 1.**

'पाहून सौख्य माते**,** देवेंद्र तोहि लाजे

शांती सदा विराजे**,** या झोपडीत माझ्या'

**उत्तर:**

आशयसौंदर्य: राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी 'या झोपडीत माझ्या' या कवितेत महालातील सुखे व झोपडीतील सुखे यांची मार्मिकपणे तुलना केली आहे. श्रीमंतीचा, वैभवाचा बडेजाव न करता झोपडीतल्या साध्या राहणीत सुख-समृद्धी व शांती मिळते, हा आशय या कवितेत सहजपणे नोंदवला आहे.

काव्यसौंदर्य: प्राप्त परिस्थितीत शुद्ध मनाने जगताना समाधान मिळते. खुल्या निसर्गात, जमिनीवर पहुडताना जे सुख मिळते, ते देवाच्या देवालाही मिळत नाही, असे या प्रस्तुत ओळींत सांगितले आहे. माझे झोपडीत राहण्याचे सुख पाहून देवेंद्रही लाजतो. त्याला माझ्या सुखाचा हेवा वाटतो; कारण देवेंद्रालाही न मिळणारी शांती माझ्या झोपडीत विराजमान झाली आहे. माझ्या झोपडीत निरामय शांती वसत आहे, असे कवींना म्हणायचे आहे.

भाषिक वैशिष्ट्ये: कवितेच्या आशयाला पूरक असा सैलसा 'ओवी' हा प्राचीन लोकछंद या कवितेत आहे. ओवी छंदात तीनही चरणांत यमक साधलेले असते. प्रस्तुत रचनेचा सहजपणे तत्त्व बिंबवण्याचा गुण आहे. पैसा, दौलत, श्रीमंती हे चोरीला उत्तेजन देणारे घटक आहेत; परंतु गरिबाच्या मनातील निर्मळ भाव हा त्यास अभय I झोपडीत माझ्या' असा केल्याने आशयाची घनता वाढते. तसेच 'या' देतो हा संदेश इतक्या सोप्या शब्दांत मांडला आहे की, ओवी सहज , हा शब्द एकाच वेळी सार्वनामिक विशेषण व क्रियापद या दोन्ही ओठात रुळते. गुणगुणावीशी वाटते. प्रत्येक ओवीचा शेवट-'या है अंगाने अर्थवाही झाला आहे.

भाषाभ्यास*:*

*(अ)* व्याकरण घटकांवर आधारित कृती*:*

शब्दसिद्धी:

प्रश्न **1.**

उपसर्गघटित व प्रत्ययघटित प्रत्येकी दोन शब्द लिहा**.**

उत्तर:

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित |
|---|---|
| अविचार | बालपण |
| सुविचार | म्हातारपण |

*(आ)* भाषिक घटकांवर आधारित कृती*:*

***1.*** शब्दसंपत्ती*:*

प्रश्न **1.**

विरुद्धार्थी शब्द लिहा:

1. मऊ
2. महाल
3. नित्य
4. शांती.

उत्तर*:*

1. मऊ × टणक
2. महाल × झोपडी
3. नित्य × अनित्य
4. शांती × अशांती.

प्रश्न **2.**

तक्ता भरा:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकवचन | तारा | | झोपडी | |
| अनेकवचन | | तिजोऱ्या | | बिछाने |

उत्तर:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकवचन | तारा | तिजोरी | झोपडी | बिछाना |
| अनेकवचन | तारे | तिजोऱ्या | झोपड्या | बिछाने |

***2.*** लेखननियम*:*

प्रश्न **1.**

अचूक शब्द ओळखा:

1. माजाव, मज्जाव, मज्जव, माज्जाव.
2. प्रभुनाम, परभुनाम, प्रभूनाम, प्रभुनमा.

3. भिती, भिति, भीति, भीती.
4. तिजोरि, तीजोरी, तिजोरी, तीजोरि.

उत्तर:

1. मज्जाव
2. प्रभुनाम
3. भीती
4. तिजोरी.

***3.*** विरामचिन्हे***:***

प्रश्न **1.**

जोड्या लावा:

(अ) **[ . ] [ ; ] [ ‘ ‘ ] [ – ]**

(आ)

1. एकेरी अवतरणचिन्ह
2. पूर्णविराम
3. संयोगचिन्ह
4. अपूर्णविराम

उत्तर:

[.] पूर्णविराम

[;] अपूर्णविराम

[‘ ‘] एकेरी अवतरणचिन्ह

[ _ ] संयोगचिन्ह

कवितेचा आशय:

लहानशा झोपडीतही सुख, शांती आणि आनंद नांदत असतो. महालातली सुखे झोपडीतही प्राप्त होतात. अशा प्रकारे झोपडीतल्या वैभवाचे वर्णन अतिशय साध्या शब्दांत या कवितेत केले आहे.

शब्दार्थ:

1. महाल – राजवाडा, प्रशस्त घर.

2. सौख्ये – सुखे, वैभव.
3. प्राप्त झाली – मिळाली, लाभली.
4. भूमी – जमीन.
5. प्रभुनाम – देवाचे नाव, भजन.
6. नित्य – नेहमी, सतत.
7. पहारा – रखवाली, नजरकैद.
8. तिजोरी – खजिनापेटी.
9. तया – त्या.
10. मज्जाव – अटकाव, निबंध.
11. शामदाने – काचेचा दिवा, झुंबर.
12. माने – सन्मान.
13. सुखे – आरामात, सुखाने.
14. बोजा – वजन, (इथे अर्थ) दडपण, धाक.
15. माते – माझे.
16. देवेंद्र – इंद्र, देवांचा राजा.
17. लाजे – शरमतो.
18. सदा – नेहमी.
19. विराजे – शोभते, नांदते.

कवितेचा भावार्थ:

एखादया राजाला राजमहालात जी सुखे मिळाली असतील, ती सर्व सुखे माझ्या झोपडीत मला लाभली आहेत. अंगणातल्या जमिनीवर आरामात निजण्याचे नि रात्री आकाशातील चांदण्यांकडे, ताऱ्यांकडे पाहण्याचे सुख मला या झोपडीत मिळते. देवाचे भजन नेहमी गात या झोपडीत मी आनंदात राहतो.

महालांमध्ये तिजोऱ्यांमधून धन साठवून ठेवलेले असते; त्यावर सक्त पहारे ठेवले जातात. तरी सुद्धा तेथे चोऱ्या होतात. माझ्या झोपडीच्या दारांना कवाडे नाहीत, ती सताड उघडी आहेत. माझ्या झोपडीला चोरांचे भय नाही; चोरण्याइतपत दौलत नसल्यामुळे माझ्या झोपडीला पहारे नाहीत.

राजवाड्यात परवानगीशिवाय शिरकाव होत नाही. ‘अटकाव’ हा शब्द तिथे असतो. माझ्या झोपडीत येण्यासाठी भीती वाटणार नाही. झोपडीत सर्व माणसांचे खुले स्वागत आहे. महालामध्ये आरामासाठी मऊ बिछाने असतात नि कंदील, झुंबरांची रोषणाई केलेली असते. माझ्या झोपडीत जमिनीवर पहुडणे हाच सन्मान आहे. धरतीचाच बिछाना आहे.

माझ्या झोपडीत कुणीही प्रेमाने या नि प्रेमाने जा. माझ्या झोपडीत ये-जा करताना कुणाच्याही मनावर दडपण असत नाही. झोपडीत राहण्याचे माझे सुख पाहून इंद्रही मनात लाजतो. माझ्या सुखाचा हेवा वाटतो. माझ्या झोपडीत नेहमी सुखशांती नांदत आहे.

IndCareer

# Maharashtra Board Solutions Class 9 Marathi Kumarbharati

**Part- 1**

- Chapter 1- वंद्य 'वन्दे मातरम्'
- Chapter 2- संतवाणी (अ) जैसा वृक्ष नेणे- संत नामदेव
- Chapter 2.2- संतवाणी (आ) धरिला पंढरीचा चोर-संत जनाबाई
- Chapter 3- कीर्ती कठीयाचा दृष्टान्त
- Chapter 4- नात्यांची घट्ट वीण
- Chapter 5- एक होती समई
- Chapter 5.1- हास्यचित्रांतली मुलं

**Part- 2**

- Chapter 6- या झोपडीत माझ्या
- Chapter 7- दुपार
- Chapter 8- अभियंत्यांचे दैवत-डॉ. विश्वेश्वरय्या
- Chapter 9- मी वाचवतोय
- Chapter 10- यंत्रांनी केलं बंड
- Chapter 10.1- इंग्लंडचा हिवाळा

**Part- 3**

- Chapter 11- मातीची सावली
- Chapter 12- महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया
- Chapter 13- थोडं 'आ' भारनियमन करूया
- Chapter 14- आदर्शवादी मुळगावकर
- Chapter 15- निरोप
- Chapter 15.1- 'बिग 5' च्या सहवासात

**Part- 4**

- Chapter 16- वनवासी
- Chapter 17- ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ
- Chapter 18- हसरे दु:ख
- Chapter 19- प्रीतम
- Chapter 20- आपुले जगणे...आपुली ओळख!
- Chapter 20.1- विश्वकोश

# About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here. You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com